जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 SEP 2019
"जनप्रवास"

# 'असेल तिथे, दिसेल त्याला' कौशल्य प्रदानाचा उपक्रम अभिनव : प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के

**कोल्हापूर • प्रतिनिधी**

'असेल तिथे, दिसेल त्याला' कौशल्य प्रशिक्षण हा अत्यंत अभिनव स्वरुपाचा उपक्रम असून दर आठवड्याला विद्यापीठात तो सातत्याने राबविला गेल्यास अनेक विद्यार्थ्यांना त्याचा लाभ होईल, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ.डी.टी. शिर्के यांनी आज येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या कौशल्य व उद्योजकता विकास केंद्राच्या वतीने आज विद्यापीठ परिसरात 'असेल तिथे, दिसेल त्याला' कौशल्य प्रशिक्षण या अभिनव उपक्रमाचे गुरूवारी आयोजन करण्यात आले. त्याचे औपचारिक उद्घाटन प्र-कुलगुरू डॉ. शिर्के आणि कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्या हस्ते झाले. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीसमोर झालेल्या या कार्यक्रम प्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. शिर्के बोलत होते.

डॉ. शिर्के म्हणाले, विद्यापीठाच्या कौशल्य विकास केंद्रातर्फे या उपक्रमामध्ये सातत्य राहण्याच्या दृष्टीने आठवड्यातून एकदा विद्यापीठातील सर्व वसतिगृहांमधील विद्यार्थ्यांसाठी तसेच केंद्रामध्ये सुद्धा इच्छुक विद्यार्थ्यांसाठी आठवड्याला एक या प्रमाणे कौशल्य प्रदान उपक्रम राबविण्यात यावा. विद्यार्थ्यांनी सुद्धा केंद्राच्या या उपक्रमांना भरभरून प्रतिसाद देऊन त्यांचा लाभ घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले.

कुलसचिव डॉ.विलास नांदवडेकर म्हणाले, विद्यार्थ्यांना पारंपरिक शिक्षणाच्या बरोबरीने विविध कौशल्ये ज्ञात असावीत, यादृष्टीने विद्यापीठाने गेल्या काही वर्षांत सातत्याने कौशल्यविषयक उपक्रम राबविले आहेत. त्याचे अत्यंत सकारात्मक परिणामही दिसून येत आहेत. या केंद्राकडून भावी काळातही विद्यार्थ्यांसाठी असे नवनवीन उपक्रम राबविण्याचा मानस असल्याचेही त्यांनी सांगितले.

केंद्राचे समन्वयक डॉ. ए.एम. गुरव या उपक्रमाविषयी माहिती देताना म्हणाले, विद्यापीठाच्या या परिसरात विद्यार्थी, पालक, कर्मचारी, शिक्षक अगर नागरिक असा चार किंवा अधिक जणांचा समूह असेल, त्याला तिथेच जागेवर प्रशिक्षण दिले जाणार आहे. त्यासाठी इन्फोसिसच्या माध्यमातून 'ट्रेन द ट्रेनर्स' कार्यशाळेतून प्रशिक्षण घेतलेले प्रशिक्षक ही कौशल्ये प्रदान करणार आहेत. प्राथमिक स्तरावर सॉफ्ट स्कील प्रदान करण्यात येणार आहेत. अशा प्रकारचा नाविन्यपूर्ण उपक्रम राबविणारे हे देशातील पहिले विद्यापीठ असेल, असेही त्यांनी सांगितले.

यावेळी प्र-कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते प्रशिक्षकांना पुस्तक भेट देऊन शुभेच्छा देण्यात आल्या. या प्रसंगी अधिसभा सदस्य पंकज मेहता, मराठी अधिविभाग प्रमुख डॉ. रणधीर शिंदे, डॉ. के.व्ही. मारुलकर, डॉ. केबी. पाटील, डॉ. गजानन राशिनकर, एम.व्ही. चव्हाण, शिवप्रसाद शेटे, विजयकुमार मुल्लाळे, विजय तिवारी, शिवप्रसाद बेकनाळकर, लिटॉन आदींसह १५ प्रशिक्षक उपस्थित होते.

या प्रशिक्षणानंतर लगेचच मुख्य प्रशासकीय इमारतीपासूनच प्रशिक्षण उपक्रमास सुरवात झाली. प्रशिक्षकांनी सामोऱ्या आलेल्या विद्यार्थी-विद्यार्थिनींना सॉफ्ट स्कील डेव्हलपमेंट संदर्भात मार्गदर्शन दिले.

लोकमत

आर. व्ही. गुरव : महोत्सवाचे शानदार उद्घाटन; मान्यवरांच्या उपस्थितीने विद्यार्थ्यांमध्ये उत्साह; स्वत:ला सिद्ध करण्याचे व्यासपीठ

# गुणी कलाकारांनी शिवाजी विद्यापीठाचे नाव उंचवावे

लोकमत न्यूज नेटवर्क

**फलटण :** 'विद्यापीठाच्या प्रत्येक महाविद्यालयात 'कलाविष्कार' या विभागातून तयार झालेले महाविद्यालयीन युवक कलाकार जिल्हा मध्यवर्ती युवा महोत्सवामध्ये सहभागी होतात. या विद्यार्थ्यांना विद्यापीठस्तरावर उत्कृष्ट कलाकारांचे मार्गदर्शन मिळते. ज्यांच्याकडे विविध कलागुण आहेत; त्यांना प्रोत्साहन देण्यात येते, अशा गुणी आणि होतकरू महाविद्यालयीन कलाकारांनी आपल्या सादरीकरणातून शिवाजी विद्यापीठाचे नाव आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचवावे,' असे आवाहन शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास समितीचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर व फलटण एज्युकेशन सोसायटी संचलित मुधोजी महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने येथील मुधोजी महाविद्यालयात शिवाजी




- ३ जिल्हे, १५०० महाविद्यालये
- ४५०० विद्यार्थी,
- ३२ कलाप्रकारांचे सादरीकरण

विद्यापीठाच्या ३९ व्या मध्यवर्ती युवा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून, त्याच्या उद्घाटनप्रसंगी डॉ. गुरव बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे उपाध्यक्ष प्राचार्य विश्वासराव देशमुख होते. यावेळी डॉ. एम. एल. होनगेकर, डॉ. आर. जी. कोरबू, डॉ. टी. के. करेकट्टी, डॉ. मीना पोतदार, सुलक्षणा कुलकर्णी, डॉ. सुधीर इंगळे, सी. यू. माने उपस्थित होते.




नसीर शिकलगार

फलटण येथील मुधोजी महाविद्यालयात शिवाजी विद्यापीठाच्या मध्यवर्ती युवा महोत्सवास गुरुवारी प्रारंभ झाला. यावेळी तरुणांनी कलाविष्कार सादर केला.

यावेळी बोलताना डॉ. आर. व्ही. गुरव म्हणाले, 'फलटणसारख्या प्राचीन आणि ऐतिहासिक शहरामध्ये हा महोत्सव होत आहे. सर्वांच्या दृष्टीने ही भाग्याची गोष्ट आहे. या महोत्सवामध्ये ३४ कला प्रकारांमध्ये स्पर्धा होणार आहेत. त्यामध्ये जिल्हास्तरावरील प्रथम तीन, तसेच १८ स्पर्धांना थेट प्रवेश देण्यात आलेला आहे. यामुळे विद्यार्थ्यांना आपली कला दाखवण्याची नामी संधी मिळाली आहे. प्रत्येकाकडे वेगवेगळी क्षमता असते, त्याचा वापर करून या महोत्सवाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी स्वत:ला सिद्ध करून दाखवावे.'

आजरा कॉलेजचे प्राचार्य डॉ. एम. एल. होनगेकर यांनी वाऱ्याच्या वेगाने सळसळणारे रक्त महाविद्यालयीन युवक कलाकारांमध्ये असून, त्यांना संधी देण्यासाठी या महोत्सवाचे आयोजन केल्याचे सांगितले. प्रत्येकाकडे वेगवेगळ्या विषयाबाबत, कलेबाबत क्षमता असते. अभ्यासात मागे असणारे विद्यार्थी आज दूरदर्शन, सिनेकलाकार तसेच खेळाडू म्हणून चांगले नाव कमावून आहेत. त्यामुळे कलाकारांना खूपच संधी आहे. जेथे गर्दी कमी आहे, अशा नवीन वाटा विद्यार्थ्यांनी निश्चित शोधाव्यात, असे आवाहन केले.

अध्यक्षपदावरून बोलताना प्राचार्य विश्वासराव देशमुख म्हणाले, 'शैक्षणिक गुणवत्ता सध्या आपल्याला तारून नेईल, याची शाश्वती राहिलेली नाही. त्यामुळे इतर कलाही जोपासून यशस्वी व्हावे. आमच्या संस्थेच्या माध्यमातून लाखो विद्यार्थी आज देश-परदेशात विविध क्षेत्रांत काम करीत असल्याचा सार्थ अभिमान आम्हाला आहे.

विद्यार्थ्यांनी नेहमी शिकत जावे. जो नेहमी शिकतो, तो इतिहास घडू शकतो. प्रास्ताविकात मुधोजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अरुण गायकवाड यांनी महोत्सवाची पार्श्वभूमी कथन करून महोत्सवाचा आढावा घेतला. महाविद्यालयीन संयोजन समितीचे सचिव डॉ. टी. व्ही. शिंदे यांनी आभार मानले.

### महोत्सव म्हणजे यात्राच!

'पळशीची पीटी' या चित्रपटाचे निर्माते धोंडिबा कारंडे यांनी या महोत्सवाला गावच्या यात्रेची उपमा दिली. युवा महोत्सव हा जगण्यास प्रेरणा, नवी उमेद देतो. 'पळशीची पीटी' सिनेमास १६ मानांकन मिळाली. फ्रान्स येथील कान्स महोत्सवात राज्यामार्फत प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळाली. माझ्या आयुष्यात युवा महोत्सव आल्यानेच मी घडलो असल्याचे कारंडे यांनी सांगितले.

**आजच्या स्पर्धा :**

आज, शुक्रवारी (दि. २७ सप्टेंबर) पाश्चिमात्य समूहगीत, लोकसंगीत, वाद्यवृंद, पाश्चिमात्य कला गायन, लोकनृत्य, शास्त्रीय गायन, सूरवाद्य, तालवाद्य, पाश्चिमात्य एकलवादन, एकांकिका, रांगोळी, फोटोग्राफी, स्थळचित्रण व मातीकाम यांचे आयोजन करण्यात आले आहे.

# तृतीयपंथीयांसाठी विद्यापीठात कार्यशाळा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ परिक्षेत्रातील तृतीयपंथीयांना विविध कौशल्ये प्राप्त व्हावीत, या उद्देशाने कौशल्य व उद्योजकता विकास केंद्रातर्फे आज, शुक्रवारी कार्यशाळा आयोजित केली आहे. मानव्यशास्त्र सभागृहातील या कार्यशाळेचे उद्‌घाटन कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते होईल. यावेळी मैत्री संघटनेच्या अध्यक्षा मयूरी हळ्ळेकर, 'अभिमान'चे संस्थापक विशाल पंजानी, विद्यापीठाचे प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के प्रमुख उपस्थित असतील.

# राबिया होउयाला यांची आजपासून व्याख्याने

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या वनस्पतिशास्त्र अधिविभागात आज, शुक्रवारपासून केंद्रीय मनुष्यबळ मंत्रालयाच्या ग्लोबल इनिशिएटिव्ह फॉर अकॅडेमिक नेटवर्क (ग्यान) या प्रकल्पांतर्गत ट्युनिशिया येथील सौंजे विद्यापीठाच्या प्राध्यापिका डॉ. राबिया होउयाला यांची व्याख्याने होणार आहेत. ३ ऑक्टोबरपर्यंत चालणाऱ्या या व्याख्यानमालेचे उद्घाटन नीलांबरी सभागृहात सकाळी ११ वाजता होणार आहे. प्रा. होउयाला या ट्युनिशियन असोसिएशन फॉर सस्टेनेबल ॲग्रिकल्चर या संस्थेच्या अध्यक्षा आहेत, अशी माहिती समन्वयक डॉ. कल्याणी पवार यांनी दिली.

लोकमत

विज्ञान



डॉ. व्ही. एन. शिंदे

# फ्रायडे फॉर फ्युचर

मंगळवारी चोवीस तारखेला कोल्हापूरला पावसाने जोरदार झोडपले. त्या दिवशी सकाळीच 'अजून परतीचा पाऊस सुरु झालेला नाही. त्याला बीस ते पंचवीस दिवसांचा वेळ आहे', असे हवामान खात्याचे निवेदन आले होते. मात्र, मंगळवारचा पाऊस अवकाळी पावसासारखा होता. आकाश काळवंडले. पूर्वेला प्रथम ढग गोळा झाले. विजांचा कडकडाट आणि ढगांचा गडगडाट होता. पाऊस पूर्वेकडून पश्चिमेकडे सरकला. पाऊण तास पाऊस पडत होता. पावसाचे हे रुप मोसमी पावसाचे नव्हते. परतीच्या पावसाचेही नव्हते. असे का घडते? याचे सोपे उत्तर ग्लोबल वॉर्मिंग आहे. हे दोन शब्द पुढचे विचार थांबवायला पुरतात. मात्र, हे 'ग्लोबल वॉर्मिंग' थांबवायचे कसे? याचे विचार सुरु झाले की, थांबायचे नाव घेत नाहीत. हा पाऊस पाहून २० सप्टेंबरला जगभरातील एक कोटी मुलांनी केलेले आंदोलन आठवू लागले. ग्रेटा थनबर्ग या स्वीडनमधील एका मुलीने सुरु केलेले 'फ्रायडे फॉर फ्युचर' आंदोलन आता जगभर मूळ धरु लागले आहे.

हे आंदोलन वयाने मोठे असणाऱ्या लोकांना विचार करायला लावणारे आहे. आपण आपल्या ऐहिक सुखासाठी पर्यावरणाची अपरिमित हानी केली. त्यामुळे ग्लोबल वॉर्मिंग वाढते. त्यामुळे निसर्गाचा लहरीपणा वाढतो. या सर्व घटनांसाठी परत आपण निसर्गालाच दोष देतो. जबाबदार धरतो. खरंतर चार पायावर चालणारा मानव, दोन पायांवर चालू लागला आणि तो मातीपासून, निसर्गापासून दूर गेला. पशूतून मानवात झालेले रुपांतर त्याला निसर्गप्रतीच्या प्रेमापासून दूर नेणारे ठरले. त्याने निसर्गाला आपल्या मर्जीप्रमाणे वाकविण्याचा प्रयत्न सुरु केला. मानवी वस्ती पाण्याशेजारी, नदीकाठी करायला सुरुवात



केली. पुढे मानवी वस्ती म्हणजेच लोकसंख्या जशी वाढू लागली, तशी वाहणाऱ्या पाण्यातून त्याची गरज भागेनाशी झाली. केवळ मानवाचे जीवन सुकर व्हावे म्हणून पाण्याच्या प्रवाहात अडथळे आणायला सुरुवात केली. नद्यांवर बांध, तलाव, धरणे बांधली. अन्नाची गरज भागविण्यासाठी जंगलांची कत्तल करून ती जमीन शेतीसाठी वापरायला सुरुवात केली. पाणी अडविल्यामुळे आणि जंगल संपविल्यामुळे जमीन अडचणीत येऊ लागली. त्यातच अधिक भौतिक सुखासाठी आम्ही औद्योगिक क्रांती आणि विकासासाठी पाण्याची आणि जमिनीची मोठी हानी केली. याचा परिणाम निसर्गावर होणे अपरिहार्य होते.

पृथ्वीवरील जीवचक्र सुरळीत राहायचे असेल तर जल, जंगल आणि जमीन यांचा समतोल राखणे अत्यंत आवश्यक आहे. यातील कोणतीही एक गोष्ट बिघडली, तर अन्य दोन्ही गोष्टींवर परिणाम अटळ आहे. इथेतर आम्ही तिन्ही गोष्टींवर अतिक्रमण करत होतो आणि आहोत. हे ज्यांच्या लक्षात येत होते, त्यांचा आवाज आम्ही ऐकतच नव्हतो. आम्हाला केवळ आमचे सुख हवे होते. आज अनेक लोक आपापल्या परीने हे थांबविण्याचा प्रयत्न करतात. मात्र, याला मिळणारा प्रतिसाद हे चित्र बदलण्यास कारण बनू शकत नाही.

अशा परिस्थितीत या एका मुलीने 'फ्रायडे फॉर फ्युचर' ही चळवळ सुरु केली. एका शाळकरी मुलीने 'युनो'च्या राष्ट्रप्रमुखांच्या 'क्लायमेट मीट' या सभेत केलेले भाषण जाणकारांना अंतर्मुख करायला लावणारे आहे. 'तुम्ही माझं बालपण, आनंद माझ्यापासून हिरावून घेतला आहे. लोक मस्त आहेत. आजारांशी झगडत आहेत. आणि ते पर्यावरण असंतुलनामुळे आणि यासाठी तुम्ही तरुणांकडे आशेने पाहण्याचे धाडस कसे करु शकता?' या प्रश्नाचे उत्तर कोणीच देऊ शकत नव्हते. एका टिन एजर मुलीने तिच्या वयाच्या मुलांशी नाते जोडायला सुरुवात केली आहे. या चळवळीशी आज जगभरातील शालेय मुले जोडली जात आहेत. ही चळवळ मुलांच्या मनात घर करु लागली आहे. ती लवकरच मोठे रुप धारण करेल, असे चित्र दिसत आहे.

दर आठवड्याला शुक्रवारी या विषयावर जागृतीसाठी वेळ द्यायचा. शांततामय मार्गाने ही मुले आंदोलन करतात. पर्यावरणासाठी, पृथ्वीसाठी, पर्यावरण चांगले टिकविण्यासाठी हे आंदोलन असेल. यात आपण मागील काही वर्षांत लावलेली झाडे जगविण्यासाठी प्रयत्न केला तर....

**(लेखक विज्ञान व तंत्रज्ञान विषयाचे अभ्यासक आणि शिवाजी विद्यापीठाचे उपकुलसचिव आहेत.)**

- कार्यशाळा : शिवाजी विद्यापीठातर्फे तृतीयपंथीयांसाठी कौशल्य विकास कार्यशाळा, स्थळ : शिवाजी विद्यापीठ, वेळ : सकाळी ११ वा.

# लोककलांनी युवा महोत्सवात आणली रंगत

## फलटणच्या मुधोजी कॉलेजमध्ये रंगला युवा महोत्सव

म. टा. वृत्तसेवा, आजरा

ढोलकीवरील थाप, दिमडीचा ठसकेबाज ठेका, चौंडक्याची लयदार किणकिण आणि साथीला संबळाची अनोखी जुगलबंदी घेत युवा महोत्सवाची गुरुवारची सायंकाळ विलक्षण रंगतदार झाली. निमित्त होते शिवाजी विद्यापीठाच्या ३९ व्या मध्यवर्ती युवा महोत्सवाचे. गुरुवारपासून सुरू झालेल्या विद्यापीठाच्या तीनदिवसीय मध्यवर्ती युवा महोत्सवातील लोककलेच्या गीत, संगीत आणि नृत्य अदाकारीने गुरुवारची सांगता मोठ्या दिमाखात आणि युवाजनांच्या सळसळत्या उत्साहाने धरलेल्या ठेक्यात झाली. गुरुवारी फलटण (जि. सातारा) येथील मुधोजी कॉलेजमध्ये शिवाजी विद्यापीठाचा ३९ वा मध्यवर्ती युवा महोत्सव रंगला.



युवा महोत्सव कार्यक्रमाच्या नृत्यातील एक क्षण.

सकाळच्या पहिल्या सत्रात येथील मुख्य रंगमंचावर श्रीमंत संजीवराजे नाईक-निंबाळकर यांच्या हस्ते महोत्सवाचे उद्घाटन झाले. यावेळी शिवाजी विद्यापीठाच्या 'विद्यार्थी विकास'चे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, प्राचार्य डॉ. एम. एल. होणगेकर आदी उपस्थित होते. मुधोजी कॉलेजचे प्राचार्य विश्वासराव देशमुख अध्यक्षस्थानी होते.

यानंतर मुख्य रंगमंचावर भारतीय समूहगीत स्पर्धा रंगल्या, तर त्याचवेळी पथनाट्य, मराठी, हिंदी, इंग्रजी वक्तृत्व आणि वादविवाद स्पर्धांमध्ये विद्यार्थी कलागुण सादर करीत होते. ज्वलंत सामाजिक, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय समस्यांची तसेच अस्मानी-सुलतानी संकटाने भरडलेले सामान्यजन, शेतकरी आत्महत्या, आर्दींची पथनाट्यातून जोरकस मांडणी केली गेली. नकला आणि एकपात्रीमधून प्रेक्षकांची खूपच करमणूक झाली. सुमारे ४६ कलावंतांनी एकपात्री प्रयोग सादर केले. सुगम गायनामध्ये 'रंगुनी रंगात माझ्या', 'मी राधिका मी प्रेमिका', 'जखमा उरातल्या उघड्या', 'दिसलीस तू फुलले ऋतू', आदी सुरस गीतांनी उपस्थितांना डोलविले.

त्यानंतर खऱ्या अर्थाने युवा महोत्सवाचे आकर्षण असलेल्या लोककलांमधील बहारदार नृत्य सादरीकरणाने वातावरणाचा नूरच पालटला. शुक्रवारी (ता.२७) पाश्चिमात्य गीत संगीत, एकांकिका, लोकवाद्यवृंद, शास्त्रीय सूर-ताल व गीत गायन आणि लोकनृत्यांचे सादरीकरण होईल.

# बहर





अमित गद्रे

रंग केवळ डोळ्यांनाच नव्हे तर मनालाही नेहमीच सुखावतात. आकाशातील इंद्रधनुष्यापासून समुद्रावर विस्तारलेल्या निळाईपर्यंत निसर्गात होणारी रंगांची उधळण केवळ आल्हाददायकच. पावसाचे थेंब झेलत ओल्याशार झालेल्या वेलींवर डोलणाऱ्या फुलांनी सध्या निसर्गाला बहर आला आहे. शिवाजी विद्यापीठाचा परिसर हा तर हिरवाईने नटलेला. वेगवेगळी फुले, पाने, वेली यांनी विद्यापीठाचे प्रांगण बहरले आहे. पानांवरच्या दवबिंदूंना जणू हिऱ्याची चमक आली आहे. पावसाने हलकीशी उसंत घेतल्यानंतर येणाऱ्या उन्हाच्या किरणांमध्ये विविधरंगी फुलोरा नजरेला सुखावत आहे. फुललेले कास पठार आणि उमललेले मसाई पठार यानंतर पावसाच्या निरोपाच्या वाटेवर विद्यापीठातील हिरवाईने मन मोहीत केले नाही तरच नवल.

# अर्ज अचूक भरा

कोल्हापूर : 'विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या विविध शिष्यवृत्तींसाठी असलेले ऑनलाइन अर्ज अचूक भरा' अशी सूचना उच्च शिक्षण संचालक कार्यालयातील अधिकारी प्रतिभा दीक्षित यांनी केल्या. सरकारच्या महाडीबीटी पोर्टलवरून सन यंदाच्या शैक्षणिक वर्षासाठी असलेल्या शिष्यवृत्तीसाठी ऑनलाईन फॉर्म भरताना येणाऱ्या अडचणी संदर्भात कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलसचिव प्रा. डॉ. व्ही. डी. नांदवडेकर होते. दीक्षित यांनी सरकारच्या शिष्यवृत्तींसंदर्भातील माहिती दिली. अर्ज www.Mahadbtmahait.gov.in या संकेतस्थळावरुन विद्यार्थ्यांचे अर्ज भरावेत, असे सांगितले. समाजकल्याण कार्यालयातील सुप्रिया काळे यांनी, फ्रिशिप योजनेची माहिती दिली.

# ‘प्रेरणास्त्रोत स्वतःमध्येच शोधा’

कोल्हापूर टाइम्स टीम

## विद्यापीठाच्या सेवा पूर्व परीक्षा मार्गदर्शन केंद्रात व्याख्यान

‘स्वतःच्या प्रेरणेचा स्रोत बाहेर नव्हे, तर तुमच्या आतमध्ये शोधा, तेव्हाच खऱ्या अर्थाने जीवनात यशस्वी होण्याची गुरूकिल्ली तुमच्या हाती येईल’, असे प्रतिपादन पोलिस अधीक्षक डॉ. अभिनव देशमुख यांनी केले. विद्यापीठाच्या सेवा-पूर्व परीक्षा मार्गदर्शन केंद्राच्या वतीने आयोजित उद्घाटन समारंभात ‘स्पर्धा परीक्षा आणि रोजगार संधी व आव्हाने’ या विषयावरील व्याख्यानात ते बोलत होते.

डॉ. देशमुख म्हणाले, ‘वेळेचे व्यवस्थापन आणि परीक्षेचा अभ्यास ही तर अत्यंत मूलभूत पायरी आहे. या अभ्यासाचे स्टडी मटेरियलही बऱ्यापैकी ठरलेले असते. त्यामुळे या परीक्षांमध्ये अन्य उमेदवारांच्या तुलनेत आपल्याला आघाडी मिळवायची असेल तर आपण जी माहिती, घटना वाचतो, त्यांचे सखोल विश्लेषण करणे आणि वाचलेल्या संकल्पनांचे उपयोजन सांगता



येणे या बाबींना अतिशय महत्त्व आहे. घटना-माहिती-ज्ञान-शहाणपण हे चार टप्पे आयुष्यात अत्यंत महत्त्वाचे असतात. केवळ एखादी घटना अगर प्रसंग माहिती झाल्यानंतर त्याची कारणमीमांसा करण्याच्या दृष्टीने आपण विचार, चिंतन करणार नाही, तोपर्यंत आपल्या विवेचनात सखोलता येणार नाही. त्यामुळे दैनंदिन जीवनातही आपण ही विश्लेषणक्षमता विकसित करण्याची सवय लावून घ्यायला हवी. तरच अखेरीस ज्ञान आणि शहाणपण येईल.’

स्पर्धा परीक्षांकडे केवळ ग्लॅमर आणि भरपूर पैसा मिळविण्याचे साधन म्हणून कुणी पाहात असेल तर हा तुमचा मार्ग नाही, हे लक्षात घ्या. स्पर्धा परीक्षेनंतरचे आयुष्य हे सन्माननीय मध्यमवर्गाचे आहे आणि इथे तुम्ही समाजाप्रती बांधिलकी निभावण्यासाठी अथक आणि अखंड मेहनत करण्याच्या इराद्याने आणि तयारीनेच आले पाहिजे, असे आवाहनही डॉ. देशमुख यांनी केले. यावेळी त्यांनी आपल्या एमबीबीएस होण्यापासून ते यूपीएससी उत्तीर्ण होण्यापर्यंतचा प्रवासही अतिशय ओघवत्या शब्दांत उलगडला.

केंद्राचे समन्वयक डॉ. पी. एस. कांबळे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. अमित कांबळे यांनी सूत्रसंचालन केले, तर सचिन कदम यांनी आभार मानले.

पुढारी

# २० ते २२ ऑक्टोबरला होणाऱ्या परीक्षा लांबणीवर

## शिवाजी विद्यापीठ परीक्षा विभागाचा निर्णय

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या कारणाने २०, २१ व २२ ऑक्टोबर रोजी शिवाजी विद्यापीठाच्या कोणत्याही परीक्षा आयोजित करण्यात येणार नाहीत. या दिवशीच्या परीक्षा पुढील तारखांना घेण्यात येतील किंवा ज्या त्या परीक्षा वेळापत्रकाच्या शेवटी घेतल्या जाणार आहेत.

विधानसभा निवडणुकीच्या तारखा २१ सप्टेंबर रोजी जाहीर झाल्या आहेत. विद्यापीठ परिक्षेत्रात २१ ऑक्टोबर रोजी मतदान होणार आहे. यादिवशी विद्यापीठाच्या काही अभ्यासक्रमांच्या परीक्षा होत्या; मात्र यादिवशी असणाऱ्या परीक्षांचे वेळापत्रक बदलणे गरजेचे होते.

विद्यापीठ परिक्षेत्रातील महाविद्यालयीन शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांची निवडणुकीकरिता मतदान अधिकारी म्हणून नियुक्ती केली जाते. त्यामुळे नियुक्त मतदान अधिकाऱ्यांना एकदिवस अगोदर, मतदान तारीख व त्यानंतर दुसऱ्या दिवशी त्यांच्या मूळ आस्थापनेवर हजर राहता येत नाही. त्यामुळे परीक्षा पुढील तारखांना घेण्यात येणार असल्याचे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी. आर. पळसे यांनी महाविद्यालयांना पाठविलेल्या परिपत्रकात म्हटले आहे.

# शिवाजी विद्यापीठात आजपासून 'ग्यान'अंतर्गत व्याख्याने

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** शिवाजी विद्यापीठाच्या वनस्पतीशास्त्र अधिविभागात शुक्रवार (दि.२७) पासून केंद्रीय मनुष्यबळ मंत्रालयाच्या ग्लोबल इनिशिएटिव्ह फॉर ॲकॅडेमिक नेटवर्क (ग्यान) या प्रकल्पांतर्गत ट्युनिशिया येथील सौजे विद्यापीठ व ट्युनिशियन असोसिएशन फॉर सस्टेनेबल ॲग्रीकल्चर संस्थेच्या अध्यक्षा डॉ. राबिया होउयाला यांच्या व्याख्यानांचे आयोजन केले आहे. व्याख्यानमालेचे उद्‌घाटन शुक्रवारी सकाळी ११ वाजता विद्यापीठातील निलांबरी सभागृहात होईल. डॉ. होउयाला या 'वनस्पतींच्या परस्परांतील संबंधाचा शाश्वत शेतीमध्ये वापर' या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. ३ ऑक्टोबरपर्यंत व्याख्यानमाला चालणार आहे, अशी माहिती समन्वयक डॉ. कल्याणी पवार यांनी दिली.

# विद्यापीठात आज तृतीयपंथी व्यक्तींसाठी कार्यशाळा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठ कौशल्य व उद्योजकता विकास केंद्रातर्फे शुक्रवारी (दि.२७) सकाळी ११.३० वाजता मानव्यशास्त्र सभागृहात तृतीयपंथी व्यक्तींसाठी विकास कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. ट्रान्सजेंडर वेलफेअर बोर्डाच्या सदस्य व मैत्री संघटना अध्यक्षा मयुरी शिवाजीराव हळवेकर, अभिमान संस्थेचे संस्थापक विशाल पंजानी यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे अध्यक्षस्थानी असणार आहेत. कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन कौशल्य व उद्योजकता विकास केंद्राचे समन्वयक डॉ.ए.एम. गुरव यांनी केले आहे.

# ‘असेल तिथे, दिसेल त्याला’ कौशल्य प्रदान उपक्रमाचा विद्यार्थ्यांना निश्‍चितच लाभ होईल

## प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के; विद्यापीठात अभिनव उपक्रमाचे उद्घाटन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

‘असेल तिथे, दिसेल त्याला’ कौशल्य प्रशिक्षण हा अभिनव उपक्रम असून दर आठवड्याला विद्यापीठात तो राबविल्यास अनेक विद्यार्थ्यांना याचा निश्‍चितच लाभ होईल, असे प्रतिपादन प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या कौशल्य व उद्योजकता विकास केंद्रातर्फे गुरुवारी विद्यापीठ परिसरात ‘असेल तिथे, दिसेल त्याला’ कौशल्य प्रशिक्षण अभिनव उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. त्याचे औपचारिक उद्घाटन प्र-कुलगुरू डॉ. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्या हस्ते झाले.

मुख्य प्रशासकीय इमारतीपासूनच प्रशिक्षण उपक्रमास सुरुवात झाली. प्रशिक्षकांनी सामोऱ्या आलेल्या विद्यार्थी-विद्यार्थिनींना सॉफ्ट स्किल डेव्हलपमेंट संदर्भात मार्गदर्शन दिले.

डॉ. शिर्के म्हणाले, उपक्रमामध्ये सातत्य राहण्याच्या दृष्टीने सर्व वसतिगृहांमधील विद्यार्थी तसेच केंद्रातील इच्छुकांसाठी कौशल्य प्रदान कार्यक्रम राबविण्यात यावा. केंद्राचे समन्वयक डॉ. ए. एम. गुरव उपक्रमाविषयी माहिती दिली. याप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते प्रशिक्षकांना पुस्तक भेट देऊन स्वागत करण्यात आले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या कौशल्य व उद्योजकता विकास केंद्रातर्फे आयोजित ‘असेल तिथे, दिसेल त्याला’ कौशल्य प्रशिक्षण उपक्रमांतर्गत विद्यार्थी-विद्यार्थिनींना कौशल्य प्रदान करताना प्रशिक्षक.

### नावीन्यपूर्ण उपक्रम राबविणारे पहिले विद्यापीठ

विद्यापीठ परिसरात विद्यार्थी, पालक, कर्मचारी, शिक्षक, नागरिक असा चार किंवा अधिक जणांचा समूह असेल, त्याला जाग्यावर प्रशिक्षण दिले जाणार आहे. त्यासाठी इन्फोसिसच्या माध्यमातून ‘ट्रेन द ट्रेनर्स’ कार्यशाळेतून प्रशिक्षण घेतलेले प्रशिक्षक कौशल्ये प्रदान करणार आहेत. अशा प्रकारचा नावीन्यपूर्ण उपक्रम राबविणारे देशातील पहिले विद्यापीठ असेल, असे डॉ. गुरव यांनी सांगितले.

यावेळी अधिसभा सदस्य पंकज मेहता, मराठी अधिविभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे, डॉ. के.व्ही. मारुलकर, डॉ. गजानन राशिनकर, एम.व्ही. चव्हाण यांच्यासह १५ प्रशिक्षक उपस्थित होते.

‘असेल तिथे, दिसेल त्याला’ कौशल्य प्रदान उपक्रमांतर्गत दिवसभरात ३४५० विद्यार्थी-विद्यार्थिनींसह ६७ पालकांना विविध कौशल्ये प्रदान करण्यात आली.

# धनंजय गुरव यांना पीएच.डी



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञान स्रोत केंद्रातील वरिष्ठ ग्रंथपाल सहायक धनंजय गुरव यांना शिवाजी विद्यापीठाची नुकतीच पीएच.डी. प्रदान करण्यात आली आहे. त्यांनी 'स्कॉलर्ली युज ऑफ इंटरनेट बाय रिसर्च स्कॉलर इन सायन्स अॅट युनिव्हर्सिटी ऑफ महाराष्ट्र' या विषयावर शोधप्रबंध सादर केला होता. त्यांना डॉ. शामप्रसाद पुजार यांचे मार्गदर्शन व विजया गुरव यांचे प्रोत्साहन लाभले.